**प्रकरण :- पाचवे**

# गृहिणीच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास

---

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण :- पाचवे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **5. गृहिणीच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास** | 125-143 |
| 5 | प्रस्तावना | 126 |
| 5.1 | घरकामावर खर्च होणारा पुरूषांचा सरासरी वेळ | 128 |
| 5.2 | गृहिणींचे वय | 130 |
| 5.3 | महिलांची शैक्षणिक माहिती | 132 |
| 5.4 | कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न | 133 |
| 5.5 | अनुभवाचा कार्यात उपयोग करणाऱ्या महिला | 135 |
| 5.6 | निर्णयात सहभागी होणाऱ्या महिला | 136 |
| 5.7 | संघटन कौशल्य असलेल्या महिला | 137 |
| 5.8 | अंदाजपत्रकाचे ज्ञान असणाऱ्या महिला | 138 |
| 5.9 | गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिला | 139 |
| 5.10 | भारतीय महिला सहनशील व कठोर परिश्रम करणारी आहे | 139 |
| 5.11 | बचत गटात सहभागी असणाऱ्या महिला | 140 |
| 5.12 | बचत गटाच्या साह्याने उद्योग, व्यवसाय करणाऱ्या महिलांची सारणी | 141 |
| 5.13 | बचत गटामुळे विकास होणाऱ्या महिलाची सारणी | 142 |

## प्रकरण - पाचवे

# गृहिणीच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास

### प्रास्ताविक

भारत हा विकसनशील देश आहे. कोणत्याही देशाचा विकास करायचा असेल तर लहानतल्या लहान घटकाचा विकास झाला की आपोआपच मोठया घटकाचा विकास होत असतो. त्यामुळे देशाचा विकास होतो. आपल्या देशात संयुक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात पूर्वी मोठया प्रमाणात होती, आज त्याचे स्वरूप बदलले असले तरी बऱ्यापैकी मोठी कुटुंबे अजुनही आहेत. कुटुंबात अनेक व्यक्ति असतात. ते आनंदाने एकत्र राहतात. त्यामध्ये एक तरी महिलांचा समावेश असतो. कुटुबातील महिला गृहिणी ही घराचे अंतर्गत व्यवस्थापन करीत असते. ती विविध भूमिका पार पाडीत असते. गृहिणीशिवाय कुटुंबाची कल्पना करता येत नाही. तिच्या कार्याची महिमा आपण प्राचीन काळापासून बघत आहोत.

गृहिणी ही कुटुंबाचा कणा आहे. कुटुंबातील मानव व साधनसंपत्तीचे व्यवस्थापन गृहिणी करीत असते. कमीत कमी साधन संपत्तीत जास्तीत जास्त समाधान मिळविण्याचा प्रयत्न करीत असते. एकाच व्यक्तिला कामे देण्यापेक्षा वयोगटानुसार, रूचीनुसार, त्याच्या वेळेत सोयीचे होतील अशा पध्दतीने वाटणी केल्याने गृहकार्य आनंददायी ठरते.

कुटुंबाचे अस्तित्व कुटुंबाच्या चांगल्या संबंधावर आणि विश्वासावर अवलंबून असते. कुटुंबात परस्परांना समजून घेणे दुसऱ्याच्या भावनेचा आदर करणे, सहकार्य, प्रेम या गोष्टी गरजेच्या असतात. तसेच मित्रमंडळी, शेजाऱ्याशी चांगले संबंध प्रस्थापित करणे, सामाजिक समस्याचे निर्मुलन

करण्यासाठी कुटुंबाने सहभाग घेतला पाहिजे. गृहिणीमुळे व्यक्ति, समाज, देशाच्या विकासात त्याचा परिणाम होत असतो.

प्रत्येकाला प्रेम, सहानुभूती, विनम्रता, त्याग, धैर्य, सर्वोत्तम मानवी गुणांचे व्यावहारिक प्रशिक्षण मिळते. घर व कुटुंबाच्या सुखाकरिता मानव नेहमी झटत असतो. सुखी घरात प्रवेश केल्यावर तो आपले सगळे कष्ट, अडचणी, थकवा व मानसिक ताण विसरून जातो.

कुटुंबात लहान मुलांचा विकास होतो. चांगले वाईट संस्कार तो कुटुंबातून घेतो. सहकार्याची भावनाही कुटुंबातून शिकतो. दुसऱ्याचा आदर करणे, कुटुंबातील व्यक्तिची कामे करणे परस्परांची काळजी घेणे, जबाबदाऱ्या पार पाडण्यास मदत करणे, इत्यादी बाबी मुलं शिकते. थोडक्यात सांस्कृतिक मुल्यांचा प्रसार घर या माध्यमातून होत असतो.

घरांबद्दलच्या कल्पना भिन्न काळात भिन्न देशात वेगवेगळया दिसतात. एकाच देशात निरनिराळया प्रांतात थोडा फार बदल दिसतो. ही भिन्नता असून सुध्दा विश्वातील सर्व देशात कौटुंबिक कार्य सर्व देशात सारखे आहे. जसजसे मानवाच्या अनुभवाचा विकास झाला तसतसा घरासंबधीच्या धारणेत बदल होत गेलेला दिसून येतो. भारतीय तत्वज्ञानाप्रमाणे स्त्री व गृह हे दोन वेगवेगळे नाहीत. व्यक्ती विकासात, बहुतेक सर्वच देशात कुटुंब चालविणाऱ्या महिलाच असतात. हे खालील सारणीवरून दिसून येते की, पुरूष घरकामात कमी लक्ष घालतात. जास्तीत जास्त वेळ महिलांचा घरकामात जात असतो. महिला आपल्या कुटुंबासाठी निस्वार्थी भावनेने कठोर परिश्रम करीत असतात, त्या भावनीकदृष्टया कुटुंबाशी जोडलेल्या असतात. कुटुंब विकासात स्त्रीयांचा महत्वपूर्ण वाटा असतो. म्हणूनच ती आता फक्त घरात राबणारी न राहता ती

जबाबदारी पेलणारी व त्या जबाबदारीचे श्रेय घेणारी गृह व्यवस्थापक झाली पाहिजे.

## 5.1 घरकामावर खर्च होणारा पुरूषांचा सरासरी वेळ :

गृहिणी आपल्या कुटुंबाकरिता अथक परिश्रम घेवून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. जास्तीत जास्त वेळ महिलांचा कुटुंबाच्या कार्यासाठी खर्च होत असतो. आंतरराष्ट्रीय महिला दिनांच्या अनुषंगाने केलेल्या ऑर्गनायजेशन फॉर इकॉनॉमिक्स को-ऑपरेशन अॅण्ड डेव्हलपमेंट (ओईसीडी) सर्वेक्षणानुसार विविध देशातील पुरूष दिवसभरात घरकामासाठी किती वेळ देतात याची माहिती पुढील सारणीवरून स्पष्ट होते. जगातील महिलांचा जास्तीत जास्त वेळ हा घरकामासाठी खर्च होत असतो. कटुंबाच्या हितासाठी, सुखासाठी नेहमी कार्य करीत असतात. हे काम त्या विनामोबदला करत असतात.

**सारणी क्र. 5.1**

**घरकामावर खर्च होणारा पुरूषांचा दिवसभरातील सरासरी वेळ**

| अ.क्र. | देश | दिवसभरातील सरासरी वेळ(मिनिटे) |
|---|---|---|
| 1 | स्लोव्हेनिया | 114 |
| 2 | फ्रान्स | 098 |
| 3 | आस्ट्रेलिया | 093 |
| 4 | जर्मनी | 090 |
| 5 | अमेरिका | 082 |
| 6 | स्पेन | 076 |
| 7 | ब्रिटन | 066 |
| 8 | चीन | 048 |
| 9 | जपान | 024 |
| 10 | भारत | 019 |

स्त्रोत :- ऑर्गनायजेशन फॉर इकॉनॉमिक्स को-ऑपरेशन अॅण्ड डेव्हलपमेंट

**आलेख क्र. 5.1**

**घरकामावर खर्च होणारा पुरूषांचा दिवसभरातील सरासरी वेळ याचा आलेख**




ऑर्गनायजेशन फॉर इकॉनॉमिक्स को-ऑपरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट या संयुक्त राष्ट्र संघटनेशी संलग्न संस्थेने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगाने जारी केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, नियमित घरकामासाठी भारतीय पुरूष सरासरी 19 मिनिटे इतका वेळ देतात. या निकषावर भारताचा समावेश खालच्या क्रमांकावर गेला आहे. या यादीत जपान, कोरिया आणि चीन या अन्य तीन आशियाई देशांतील पुरुषांचा क्रमांकही खालच्या पातळीवरच आहे. स्नोव्हेनियामध्ये पुरूष सर्वाधिक म्हणजे दिवसभरात सरासरी 114 मिनिटे इतका वेळ नियमित घरकामासाठी (विनामोबदला) देतात. यानंतर डेन्मार्क आणि आस्ट्रेलिया या देशांचा क्रमांक लागतो. विनामोबदला  कुटुंबासाठी वेळ देणे म्हणजे कुटुंब आपले आहे हीच भावना वाढीस लागते. स्त्रियांमध्ये असलेली निस्वार्थी भावना, पैशांच्या मोबदल्याची अपेक्षा न करता काम करणे,

इतरांचा विचार करणे ही भावना भारतीय संस्कृती, कुटुंब, समाज व राष्ट्रासाठी आवश्यक आहे. त्यामुळेच कुटुंब, समाज व राष्ट्र या संकल्पना टिकून आहेत. मनुष्य जीवन जगण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. कुटुंब सुदृढ तर समाज सशक्त व समाज सशक्त तर राष्ट्र बलशाली. म्हणून कुटुंब हा पाया आहे. जो गृहव्यवस्थपकाने सशक्त करावयाचा आहे.

कुटुंबातील महिला हे कुटुंबासाठी सतत कार्यरत असते. घरगुती कामाचा गृहिणीला कोणताच मोबदला मिळत नाही. त्यामुळे गृहिणीच्या कामाचे महत्व समाजातील लोकांना पटलेले नाही आणि हे सर्व कार्य गृहिणी आपल्या कुटुंबातील सदस्याच्या भावनिक, मानसिक समाधानासाठी करीत असते. प्रफुल्याकुमारी यांच्या संशोधनानुसार गृहिणीला घरातील इतर सदस्यापेक्षा अधिक कामे करावी लागते. कुटुंबाचा आकार जसजसा वाढतो तसतसे तिच्या कामाचे प्रमाण वाढते. आपल्या कुटुंबातील सदस्यासाठी दिवसरात्र कार्य करीत असते.

**गृहिणींचा वैयक्तिक माहितीचा अभ्यास :**

अभ्यासासाठी नमुना म्हणून निवडलेल्या गृहिणींची प्राथमिक सर्वेक्षणांद्वारे मिळविलेली माहितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला.

**5.2 गृहिणींचे वय :**

गृहिणींचे वय हा एक महत्वाचा भाग आहे. वयावर आधारित शिक्षण, कार्यक्षमता अशा अनेक बाबी अवलंबून असतात. गृहिणी म्हणून कार्य करीत असताना वयाचा गृहिणीच्या कार्यावर परिणाम होतो काय हे पाहण्यासाठी गृहिणीच्या वयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. कुटुंबातील महिला सभासदांचे वय एक महत्वाचा घटक आहे. शिक्षण, कार्यक्षमता, नेतृत्व,

निर्णयक्षमता हे वयावर अवलंबून असते. त्यामुळे संशोधीकेने प्रतिसादक गृहिणींच्या वयांचा तपशील खालील सारणीत दर्शविलेला आहे.

**सारणी क्र. 5.2**

**गृहिणीचे वय दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | वयोगट(वर्ष) | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | 15-25 | 65 | 13.00% |
| 2 | 25-35 | 112 | 22.40% |
| 3 | 35-45 | 173 | 34.60% |
| 4 | 45-55 | 50 | 10.00% |
| 5 | 55-65 | 57 | 11.40% |
| 6 | 65- पेक्षा जास्त | 43 | 08.60% |
| | एकूण | 500 | 100.00 |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

**आलेख क्र. 5.2**

**गृहिणीचे वय दर्शविणारा आलेख**



वरील सारणी क्र. 5.2 नुसार असे दिसून येते की, सर्वेक्षित कुटुंबातील महिला सभासदाचे वय 15-25 वय असणाऱ्या गृहिणी 65 (13%) आहेत. 25-35 वयोगटात 112 (22.4%) गृहिणी, 35-45 वर्ष वयोगटात 173 (34.6%) गृहिणी, 45-55 वर्ष वयोगटात 50 (10%) गृहिणी, 55-65 वर्ष वयोगटात 57 (11.4%) गृहिणी, तसेच 65 पेक्षा जास्त वयोगटात 43 (8.6%) गृहिणी असल्याचे आढळून आले आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, 35-45 वर्ष वयोगटातील गृहिणीची संख्या 173 (34.6%) सर्वाधिक आहे.

## 5.3 महिलांची शैक्षणिक माहिती

शिक्षण हा माणवाच्या जीवनावर परिणाम करणारा फार मोठा घटक आहे. शिक्षणामुळे कौंटुबिक, सामाजिक, व्यावसायिक कार्यक्षमतेवर परिणाम होवू शकतो. संशोधिकेने प्रतिसादक महिलांच्या शिक्षणाचा अभ्यास पार्श्वभूमी म्हणून केला असून त्याचा तपशील खालील सारणीत दर्शविला आहे.

**सारणी क्र. 5.3**
**महिलांची शैक्षणिक माहिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | महिलांची शैक्षणिक माहिती | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | प्राथमिक | 37 | 07.4% |
| 2 | माध्यमिक | 60 | 12.0% |
| 3 | उच्चमाध्यमिक | 117 | 23.4% |
| 4 | पदवी | 218 | 43.6% |
| 5 | पदवीत्तर | 53 | 10.6% |
| 6 | व्यावसायिक शिक्षण | 15 | 03.0% |
| | एकूण | 500 | 100.0% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

**आलेख क्र. 5.3**

**महिलांची शैक्षणिक माहिती दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्र. 5.3 नुसार असे दिसून येते की, महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करीत असताना पदवीचे शिक्षण घेतलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक 218 (43.6%) आहे. तर सर्वात कमी 15(3.0%) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या असल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, सुशिक्षीत गृहिणीची संख्या जास्त आहे. त्यांच्या शिक्षणाचा उपयोग त्याच्या कार्यपध्दतीवर, नियोजनावर, निर्णय क्षमतेवर होत असतो.

**5.4 कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न :**

कौंटुंबिक कार्य सुरळित चालण्यासाठी उत्पन्न महत्वाचा भाग आहे. उत्पन्नावर त्या कुटुंबाचे राहणीमान अवलंबून असते. गरीब, असो श्रीमंत असो त्याच्या गरजा पूर्ण कराव्या लागतात. कमी उत्पन्न असणाऱ्याच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्याकडे अधिक असतो. जसजसे उत्पन्न वाढते तसतसे मूलभूत

गरजाव्यतिरिक्त अन्य गरजावर होणारा खर्च वाढतो. व्यक्तिच्या जीवनाचा विकास उत्पन्नावर अवलंबून असतो. उत्पन्नाच्या वाढीवर सुध्दा व्यक्तिच्या विकासात वाढ व वृध्दी होत असते. गृहव्यवस्थापन करीत असताना गृहव्यवस्थापनावर उत्पन्नाचा परिणाम होत असतो.

कुटुंबातील सदस्य संख्या त्याचे वय, व्यवसाय, कुटुंबाची मूल्ये, उपलब्ध साधने याचा कुटुंबाच्या जीवनस्तरावर परिणाम होतो. प्रत्येक कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा व कुटुंबाचे उत्पन्न याचा परस्परसंबंध आहे. म्हणून कुटुंबाचे वार्षीक उत्पन्नाची माहिती पुढील सारणीत दिलेली आहे.

**सारणी क्र. 5.4**

**कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न गट | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | 00 लाख – 03 लाख | 100 | 20.0% |
| 2 | 03 लाख – 06 लाख | 108 | 21.6% |
| 3 | 06 लाख – 09 लाख | 127 | 25.4% |
| 4 | 09 लाख – 12 लाख | 103 | 20.6% |
| 5 | 12 लाख – 15 लाख | 49 | 09.8% |
| 6 | 15 लाखापेक्षा जास्त | 13 | 2.6% |
| | **एकूण** | **500** | **100.0%** |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

**आलेख क्र. 5.4**

**कुटुंबाचे  वार्षीक उत्पन्न दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्र. 5.4 नुसार असे दिसून येते की, 6 लाख ते 9 लाख वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वात जास्त 127 (25.4%) आहे तर सर्वात कमी 15 लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या 13 (2.6%) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबांचे उत्पन्न वाढत आहे. त्यामुळे कुटुंबातील कार्यात अर्थिक अडचणी येणार नाहीत.

### 5.5 अनुभवाने कार्यात सुलभता प्राप्त होते

गृहिणीचा जेवढा अनुभव जास्त तेवढे निर्णय लवकर घेता येतात व साधनसंपत्तीची बचत होते. अनुभव हे वारंवार कामाचे निरीक्षण किंवा काम केल्यास प्राप्त होतात. घरगुती कामाचे ज्ञान परंपरागत पध्दतीने प्राप्त होते व काम केल्याने अनुभवात वाढ होते. तेच ते काम केल्याने त्या कामात निपुणता येते. वेळ, पैसा, शक्ति असून चालत नाही तर त्या विषयाचे ज्ञान असावे

लागते. ज्ञानामुळे समस्येचे पर्यायी मार्ग सूचतात. योग्य मार्गाची निवड करता येते. आपल्या जीवनात सुख समृध्दी आणता येते.

**सारणी क्र. 5.5**

**अनुभवाचा कार्यात फायदा होणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | अनुभवाचा कार्यात फायदा होतो | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 478 | 95.6% |
| 2 | नाही | 022 | 04.4% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.5 नुसार असे दिसून येते की, कौटुंबिक कार्यात आपल्या अनुभवाचा फायदा होते व कार्यात सुलभता येते असे मत असणाऱ्या गृहिणीची संख्या 478 (95.6%) इतकी आहे तर कौटुंबिक कार्यात आपल्या अनुभवाचा फायदा न घेणाऱ्या गृहिणीची संख्या 22 (4.4%) इतकी आहे

यावरून असे स्पष्ट होते की, कौटुंबिक कार्यात आपल्या अनुभवाचा फायदा होणाऱ्या गृहिणीची संख्या 478 (95.6%) सर्वाधिक आहे.

## 5.6 निर्णयात सहभागी होणाऱ्या महिला

दैनंदिन जीवनात अनेक समस्या असतात. त्या समस्या योग्य निर्णय घेवून सोडवाव्या लागतात. काही समस्या साध्या व सोप्या असतात. अनुभवामुळे व सवयीने योग्य निर्णय घेवून त्या सहज सोडविता येतात. परंतु काही समस्या गुंतागुंतीच्या असतात. अशा समस्या सोडविताना विचारपूर्वक निर्णय घ्यावे लागतात. अभ्यासासाठी निवडलेल्या गृहिणीची निर्णय क्षमता दर्शविणारी सारणी पुढील प्रमाणे आहे.

**सारणी क्र. 5.6**

**निर्णय क्षमता दर्शविणारी गृहिणीची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | त्वरीत निर्णय घेणे | 372 | 74.4% |
| 2 | निर्णयात सहभागी न होणे | 128 | 25.6% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.6 नुसार असे दिसून येते की, त्वरीत निर्णय घेणाऱ्या गृहिणीची संख्या 372 (74.4%) इतकी आहे तर निर्णयात सहभागी न होणाऱ्या गृहिणीची संख्या 128 (25.6%) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, निर्णयात सहभागी होवून त्वरीत निर्णय घेणाऱ्या गृहिणीची संख्या 372 (74.4%) सर्वाधिक आहे.

### 5.7 संघटन कौशल्य असलेल्या महिला

कुटुंबात अनेक व्यक्ति असतात. सर्व व्यक्ति सुखी व समाधानाने एकत्र राहतात. यांना संघटित ठेवण्याचे कार्य कुटुंबातील गृहिणी करित असते. संघटन कौशल्याचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणात केला असून त्याचा तपशील पुढील सारणीत दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. 5.7**

**संघटन कौशल्ये असणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | संघटन कौशल्ये असणे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 398 | 79.6% |
| 2 | नाही | 102 | 20.4% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.7 नुसार असे दिसून येते की, संघटन कौशल्ये असणाऱ्या महिलांची संख्या 398 (79.6%) इतकी आहे तर संघटन कौशल्ये नसणाऱ्या महिलांची संख्या 102 (20.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील सदस्यांना संघटीत करण्याचे कौशल्य असणाऱ्या गृहिणीची संख्या 398 (79.6%) सर्वाधिक आहे.

### 5.8 अंदाजपत्रकाचे ज्ञान असणाऱ्या महिला

कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करताना अनेक अडचणी येतात. काही वेळा गृहिणीचे अंदाज बरोबर असतात तर काही वेळा अंदाज चुकण्याची शक्यता असते. कामाच्या अनुभवानुसार अंदाजामध्ये अचूकता येते. अंदाजपत्रक तयार करताना अडचणीचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणात करण्यात आला असून त्याचा तपशील पुढील सारणीत दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. 5.8**

**अंदाजपत्रक तयार करताना येणाऱ्या अडचणीची स्थिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | अडचणी | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 125 | 25% |
| 2 | नाही | 375 | 75% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.8 नुसार असे दिसून येते की, कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करताना 125 (25%) गृहिणीना अडचणीना सामोरे जावे लागले असे मत मांडले तर 375 (75%) गृहिणीनी अंदाजपत्रकाचे कार्य करताना कोणत्याही अडचणी येत नसल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील अंदाजपत्रकाचे कार्य करीत असताना 375 (75%) सर्वाधिक गृहिणी व्यवस्थितपणे अंदाजपत्रक तयार करतात.

## 5.9 गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिला

कौटुंबिक स्वरावर अनेक समस्या असतात. त्या सोडविण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ति करीत असते. भविष्यकाळाची चिंता दूर करण्यासाठी विविध स्वरूपात गुंतवणुक केली जाते. गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिलांची माहिती पुढील सारणीत दर्शविले आहे.

**सारणी क्र. 5.9**

**गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | गुंतवणुक | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 390 | 78% |
| 2 | नाही | 110 | 22% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.9 नुसार असे दिसून येते की, गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिलांची संख्या 390 (78%) इतकी आहे तर गुंतवणुकीचे ज्ञान नसणाऱ्या महिलांची संख्या 110 (22%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिलांची संख्या 390(78%) सर्वाधिक आहे.

## 5.10 भारतीय महिला सहनशील व कठोर परिश्रम करणारी आहे.

भारतात विविध जाती धर्माचे लोक राहतात. विविध सण उत्सव साजरे केले जातात. रुढी, परंपरा व प्राचीन संस्कृतीचे जतन केले जाते. कुटुंबातील गृहिणी आपल्या कुटुंबासाठी सतत कार्य करीत असते. कोणत्याही

मोबदल्याची अपेक्षा न करता ती कुटुंबासाठी कठोर परिश्रम करीत असते. तसेच सहनशीलता हा गुण तिच्यात आहे. आपल्या मुलांसाठी व कुटुंबातील व्यक्तिसाठी निरंतन कार्य करीत असते. निवड केलेल्या गृहिणीच्या प्राथमिक सर्वेक्षणाव्दारे करण्यात आला असून त्याची माहिती पुढील सारणीत दर्शविली आहे.

**सारणी क्र. 5.10**

**सहनशील व कठोर परिश्रम करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | सहनशील व कठोर परिश्रम | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 398 | 79.6% |
| 2 | नाही | 102 | 20.4% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.10 नुसार असे दिसून येते की, महिलांमध्ये सहनशीलता व कठोर परिश्रम करण्याची तयारी आहे असे मत असणाऱ्या महिलांची संख्या 398 (79.6%) इतकी आहे तर महिलांमध्ये सहनशीलता व कठोर परिश्रम करण्याची तयारी नाही असे मत असणाऱ्या महिलांची संख्या 102 (20.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, महिलांमध्ये सहनशीलता व कठोर परिश्रम करण्याची तयारी आहे असे मत असणाऱ्या महिलांची संख्या 398 (79.6%) सर्वाधिक आहे.

### 5.11 बचत गटात सहभागी असणाऱ्या महिला :

बचत गटात सहभागी होवून विविध उद्योगाची माहिती करून घेण्याचा प्रयत्न महिला करीत असतात. बचत गटात सहभागी होणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी 5.11**

**बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | बचत गटात सहभागी असलेल्या महिला | 337 | 67.40 % |
| 2 | माहितीच्या अभावामुळे बचत गटात सहभागी नसलेल्या महिला | 030 | 06.00 % |
| 3 | बचत गटात सहभागी होण्याची इच्छा नसलेल्या महिला | 123 | 24.60 % |
| 4 | कुटुंबातील व्यक्तिंचा पाठिंबा नसल्यामुळे बचत गटात सहभागी नसलेल्या महिला | 010 | 02.00 % |
| | **एकूण** | **500** | **100.00 %** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.11 नुसार असे दिसून येते की, बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलाची संख्या 337 (67.40%) इतकी आहे, माहितीच्या अभावामुळे बचत गटात सहभागी नसलेल्या महिलांची संख्या 30 ( 6%) आहे, बचत गटात सहभागी होण्याची इच्छा नसलेल्या महिलांची संख्या 123 (24.60%) आहे. तर कुटुंबातील व्यक्तिंचा पाठिंबा नसल्यामुळे बचत गटात सहभागी नसलेल्या महिलाची संख्या 10 (2.0%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलाची संख्या 337 (67.40%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

**5.12 बचत गटाच्या साह्याने उद्योग, व्यवसाय करणाऱ्या महिला :**

बचत गटात सहभागी होवून विविध प्रकारचे उद्योग व व्यवसाय करणाऱ्या महिला आपला व आपल्या कुटुंबाचे राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करीत असतात. अर्थिकदृष्टया स्वावलंबी होतातच इतरही बेरोजगारांना रोजगाराची संधी निर्माण करून देत असतात. अशा महिलांचा अभ्यास

प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे करण्यात आला असून त्याचा तपशील पुढील सारणीत दिलेला आहे.

**सारणी 5.12**

**बचत गटाच्या साह्याने उद्योग, व्यवसाय करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 321 | 64.20 % |
| 2 | नाही | 179 | 35.80 % |
| | **एकूण** | 500 | 100.00 % |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.12 नुसार असे दिसून येते की, बचत गटाच्या साह्याने उद्योग व व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या 321 ( 64.2 %) सर्वाधिक आहे.

**5.13 बचत गटामुळे विकास होणाऱ्या महिला :**

बचत गटात सहभागी होवून आपल्या अंगी असलेले कौशल्यांचा वापर करून विविध व्यवसाय व उद्योगाच्या साहाय्याने आपला आर्थिक विकास करून घेतला जातो. बचत गटामुळे अर्थिक विकास, कौटुंबिक विकास, स्वयंविकास झालेल्या महिलांचे विवरण पुढील सारणीत दिलेले आहे.

**सारणी 5.13**

**बचत गटामुळे विकास होणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | आर्थिक विकास | 240 | 48.0 % |
| 2 | कौटुंबिक विकास | 120 | 24.0 % |
| 3 | स्वयं विकास | 140 | 28.0 % |
| | **एकूण** | **500** | **100 .00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 5.12 नुसार असे दिसून येते की, बचत गटामुळे आर्थिक विकास होणाऱ्या महिलाची संख्या 240 (48%) इतकी आहे, बचत गटामुळे कौटुंबिक विकास होणाऱ्या महिलाची संख्या 120 (24%) इतकी आहे तर बचत गटामुळे स्वयंविकास होणाऱ्या महिलाची संख्या 140 (28%) इतकी असल्याचे दिसून आले.

यावरून असे स्पष्ट होते की, बचत गटामुळे आर्थिक विकास होणाऱ्या महिलाची संख्या 240 (48%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.